# 30 नोव्हेंबर

## आजचा सुविचार :

**दृष्टीकोन हा मनाचा आरसा आहे. तो नेहमी विचारच परावर्तीत करतो.**

## आजचे पंचांग :

वार – मंगळवार
तिथी - कार्तिक कृ
नक्षत्र – हस्त
सूर्योदय – सकाळी 6.57 वाजता
सूर्यास्त – सायंकाळी 5. 58 वाजता

## आजचे दिनविशेष :

1858 : **भारतीय वनस्पती शास्त्रज्ञ डॉ. जगदीशचंद्र बोस यांचा जन्म.**
1872 : **हॅमिल्टन क्रिसेंट, ग्लासगो येथे स्कॉटलंड व इंग्लंड यांच्यामधे जगातील पहिला आंतरराष्ट्रीय फुटबॉल सामना खेळण्यात आला.**
2000 : **पाच अंतराळवीर आणि महाकाय सौरपंखे घेऊन एन्डेव्हर या अंतराळयानाने फ्लोरिडातील केप कॅनव्हेरॉल येथून आंतरराष्ट्रीय अवकाश स्थानकाच्या दिशेने उड्डाण केले.**

## आजचे इंग्लिश शब्द : ( Parts of body / लाकूड वस्तू ) :

**1) Chair – खुर्ची 2) Table - टेबल 3) Cupboard – कपाट 2) Door - दरवाजा 3) Window – खिडकी**

## आजची प्रश्नमंजुषा :

**1) कोणत्याही चार वनस्पती / झाडांची नावे सांगा. 2) मुन्गीसारख्या दिसणाऱ्या कीटकांची नावे सांगा.**
**3) 15 x 6 = किती? 4) ताजमहाल कोठे आहे? 5) जलचक्र म्हणजे काय?**

## बोधकथा :

### स्वार्थी मांजर

एका मांजराने आपल्या मालकाचा आवडता पोपट मारून खाल्ला. तेव्हा मालकाने, 'ते मांजर दिसले तर मारून टाकीन' असे रागाने म्हटले. ते ऐकताच मांजर इतके घाबरले की ह्या प्रसंगातून देवाने आपल्याला वाचविले तर पुढे आपण कोणताही पक्षी कधीही मारून खाणार नाही अशी प्रतिज्ञा केली. थोड्या वेळाने दिवाणखाण्याच्या खिडकीतून एक वटवाघूळ अचानक आत आले ते पाहून असल्या मोह उत्पन्न करणाऱ्या प्रसंगी कोणत्या प्रकारचे वर्तन करावे हा प्रश्न मांजराला पडला. एकीकडे भूक व दुसरीकडे प्रतिज्ञाभंग होण्याची भिती अशा पेचात ते सापडले असता काही वेळाने आपली भूक भागविण्याची एक युक्ती त्याला आढळून आली. वटवाघूळाकडे पाहून ते आपल्याशीच म्हणाले, 'हा पक्षी आहे असं जर मानलं तर केलेल्या प्रतिज्ञेप्रमाणे याला हात लावण्याचा अधिकार मला नाही, पण याच्या तोंडाचं उंदराच्या तोंडाशी इतकं साम्य आहे की, याला मारून खाण्याचा अधिकार मला आहे.' इतके बोलून तिने त्या वटवाघूळाला खाऊन टाकले.

तात्पर्य– स्वार्थ साधण्याची वेळ आली असता लबाड लोक आपली प्रतिज्ञा युक्तीने गुंडाळून ठेवतात.